International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# स्त्री संताचा विद्रोही स्वर

**रुपाली सातापा पाटील**

*संशोधक विद्यार्थीनी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

*Corresponding Author – रुपाली सातापा पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.18654419**

**प्रस्तावना :**

भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासात भक्ती चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मध्ययुगीन काळात उदयास आलेली ही चळवळ केवळ ईश्वरभक्तीपुरती मर्यादित नाही. ती सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांची व्यापक अशी पुनर्रचना करणारी चळवळ होती. जातिभेद, कर्मकांड, वर्णव्यवस्था आणि धार्मिक सत्ताधाऱ्यांच्या अधिपत्याला आव्हान देऊन भक्ती चळवळीने मानवतेचा आत्मा अधोरेखित केलेला दिसून येतो. 'ईश्वर सर्वांचा आहे' या संकल्पनेवर अवलंबून राहून समता, प्रेम, करुणा आणि आत्मसन्मान या मूल्यांचा पुरस्कार करण्यात आला. या भक्ती चळवळीत स्त्री संतांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असलेले पहावयास मिळते. तरी पारंपरिक साहित्य इतिहासात त्याकडे दुय्यम दृष्टीने पाहिले गेले आहे.

स्त्री संत साहित्यातील विद्रोह हा उघड राजकीय बंड नाही. समाजातील विषमता, जातीभेद, कौटुंबिक एक स्त्री म्हणून तिला मिळालेली वागणूक या सर्वांचा संबंध सारीपाठ ती आपल्या अभंगातून व्यक्त करताना दिसते. तो सूक्ष्म, पण प्रभावी असा मानवी अस्मितेचा संघर्ष आहे. पितृसत्ताक मूल्यव्यवस्था, धार्मिक पुरुषसत्ताक परंपरा , जातिभेद, देहशुद्धीच्या कल्पना आणि स्त्रीच्या नैसर्गिक भावविश्वावर लादलेली अनेक बंधने यांविरुद्ध स्त्री संतांनी भक्तीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केलेला दिसून येतो.

मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, सोय राबाई यासारखे स्त्री संतांचा व्यक्त होणारा आत्मस्वातंत्र्याचा आग्रह या सर्व स्वरूपांतून स्त्री संतांचा विद्रोही स्वर स्पष्टपणे जाणवतो.

या स्त्री संतांच्या लेखनात मानवतेचा आत्मा ठळकपणे प्रकट होताना दिसतो. ईश्वरप्राप्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षाची प्रक्रिया नाही. ती मानवी प्रतिष्ठा, समानता आणि आत्मसन्मानाची भूमिका मांडताना दिसून येते.

मध्ययुगीन मराठी भक्ती परंपरेतील स्त्री संत साहित्य हे केवळ धार्मिक नाही. त्या साहित्यातून स्त्री भावनांचा, जगण्यांचा, दुःखाचा आणि आत्मसुखाचे सखोल दस्तावेज आहे. संत स्त्रियांची वांङमयीन कामगिरी ही सामाजिक, अध्यात्मिक आणि मानवी समतेच्या दृष्टिकोनावर मांडलेली दिसून येते. त्या अनुषंगाने त्यांचे हे लेखन मुलत: बंडखोरी नाही, तर प्रस्थापित व्यवस्थेला जाणीवपूर्वक प्रश्न विचारणारी आहे. त्यांचा विद्रोह हा विचारांच्या पातळीवर व्यक्त होताना दिसतो. त्या काळातील समाज रचनेमध्ये स्त्रीला शूद्र मानले जात होते. पण संतांनी तळागाळातील शूद्र तसेच स्त्रिया यांना एका पातळीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. यातून स्त्रियांना अभिव्यक्त होण्याचा अधिकार मिळाला. प्रत्येकीने आपल्या वाटेला आलेले जीवन तक्रार न करता कंठिले. पण ते आपल्या रुढ चाकोरीला बाजूला करून, मळलेली वाट दूर सारून

आपल्या गुरुचा उपदेश मान्य करून उच्च पदावर पोहोचलेल्या दिसून येतात. या संत स्त्रियांनी जीवन अनुभवाला वांङमयीन स्वरूप दिले. आपल्या आत्म जाणिवेतून, अनुभवातून समाजामध्ये शूद्र मानले असून पुरुषसत्ताक जाती व्यवस्थेला एक स्त्री म्हणून आपली असाहयता मांडताना दिसते.

सदर संशोधनाचा उद्देश हा भक्ती चळवळीच्या व्यापक मानवतावादी दृष्टीने स्त्री संत साहित्यातील विद्रोहाचा अभ्यास करणे हा आहे. स्त्री संतांच्या अभिव्यक्तीतून निर्माण झालेला हा विद्रोह कसा सामाजिक परिवर्तनाचा घटक ठरतो, तसेच तो भक्ती चळवळीच्या मूलभूत तत्त्वांशी कसा सुसंगत आहे, याचा सखोल मागोवा घेणे हे या अभ्यासाचे प्रमुख प्रयोजन आहे. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन स्त्री संत साहित्याकडे केवळ भक्तिभावाच्या दृष्टिकोनातून न पाहता, मानवी मूल्ये, सामाजिक समता आणि स्त्री अस्मिता यांच्या संदर्भात पुनर्विचार करण्याचा प्रयत्न करत आहे.

**मुक्ताबाई :** (इ. स. १२७९-१२९७/श. १२०१-१२१९)

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान यांची लहान बहीण मुक्ताबाई ही चार संन्याशांची पोरं म्हणून सुरुवातीला उपेक्षित राहिलीत. पण त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना संत मंडळात मानाचे स्थान प्राप्त झाले. वारकरी स्त्री संतांमध्ये मुक्ताबाई भक्ती परंपरेचे प्रतीक असणाऱ्या आद्यकवयित्री ठरल्या. मुक्ताबाईंनी समाजाने दिलेला बहिष्काराला देखील वैचारिक दृष्टीने प्रतिकार केलेला दिसून येतो. संन्यास घेतल्याने समाजाने या भावंडांना वाळीत टाकले, पण त्याला विरोध दर्शवताना आपल्या अनुभवातून, प्रबोधनात्मक असा समाजाला संदेश दिला.

"साधू तोचि जाणा| जेणे सोशिला जनराणा||"

मुक्ताबाईंचा विद्रोह आधुनिक अर्थातील आक्रमक असणारा बंड दिसून येत नाही. वैचारिक अनुभवातून नैतिक आणि अध्यात्मिक स्वरूपाचा असणारा दिसतो. त्यांनी पितृसत्ताक असणारी त्यावेळची परिस्थिती ज्या काळी स्त्रियांना अध्यात्माविषयी लिहायला वाचायला बंधने होती, पुरुषांचे अनुभव आणि उपदेश हा अंतिम मानला जात होता. तेव्हा मुक्ताबाईंनी नामदेवासारख्या श्रेष्ठ संतांला त्यांनी 'अखंड जयाला देवाचा शेजार| काय अहंकार नाही गेला|' असे परिक्षण करुन 'कच्चा माठ' म्हणणे तसेच चांगदेव सारख्या श्रेष्ठ योगी पुरुषाचे 'गुरुपद' स्वीकारणे हे पुरुषप्रधान मानसिकतेला थेट आव्हान देणारे ठरते. यातून असे दिसते की, ज्ञान, नैतिकता, अध्यात्मिक अनुभव हा लिंगावर किंवा वयावर अवलंबून नसतो. यासाठी हे सर्व पेलवणारी स्त्री देखील तितकीच सक्षम असते, असे मुक्ताबाईंनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. जी आजच्या स्त्रीवादाशी सुसंगत आहे.

"संग्रामि शूराने काढू नये अंग| अनुभवासी नंग लागे येणे ||"

या उक्तीतून असे सुचित होते की, अनुभवाच्या बाबतीत वाद, आक्रमकता, बौद्धिक संघर्ष उपयोगाचा नसतो. अनुभव हा सरळ दिसून येत असतो. त्याला दिखावव्याची, शक्ती प्रदर्शनाची किंवा संघर्ष करण्याची गरज नसते. त्यामध्ये पुरुषप्रधानतेला, परंपरेला मुक्ताबाईनी नाकारलेले दिसून येते. हाच पुरुषप्रधान परंपरेचा विद्रोह अतिशय सूक्ष्मपणे मांडलेला दिसून येतो. मध्ययुगात स्त्रीला अनुभव बोलण्याचा अधिकार नव्हता. तेव्हा ज्ञान हे शास्त्र आहे आणि शास्त्र म्हणजेच पुरुष, अशा सामाजिक मानसिकतेमध्ये मुक्ताबाईची व्यक्त होणारी भूमिका सरळ बंडखोरी म्हणता येणार नाही. कारण त्याचा विद्रोह हा आक्रमक स्वरूपाचा नव्हता.

अनुभवूनी सार ज्याचे त्यांनी पहावे|
जुनियाला नवे म्हणू नये|

आरंग उगवे तरंग माळवे|
राहिले निवळ निजरूप||

मुक्ताबाईंचा हा अभंग पारंपारिक सत्तेला आव्हान देणार आहे. मध्ययुगातील स्त्री तसेच शुद्रांना शास्त्र ज्ञानाचा अधिकार नव्हता. अशा परिस्थितीमध्ये अनुभव हा ज्ञानाचा स्त्रोत्र मानणे. अनुभव हा जात, लिंग, वर्ग, धर्म पाहत नाही तो सर्वांनाच उपलब्ध असतो. यातून अनुभवाला महत्त्वाचे स्थान देऊन अप्रत्यक्षपणे त्या जातीव्यवस्थेला आणि पुरुषप्रधानतेतील ज्ञान रचनेला नाकारलेले दिसून येते मुक्ताबाईंच्या या ओवीतील विद्रोह हा आत्मा अनुभवातून घडलेल्या नैतिकतेवर अवलंबून आहे तो त्याच सामाजिक विरोध न राहता व्यक्तीच्या आत्मवृत्तिवर नवीन जीवनदृष्टी निर्माण करतो. त्यामुळे हा संघर्ष बाह्य स्वरूपाचा नसून अंतर्गत परिवर्तन घडवण्याच्या प्रक्रियेतून व्यक्त झालेला विद्रोह दिसून येतो. आज ही स्त्रीचे अनुभव हे वैयक्तिक तसेच भावनिकदृष्ट्या दुर्लक्षित केले जाताना पाहावयास मिळते. म्हणून मुक्ताबाईना आलेला साहित्यातून अनुभव हा ज्ञानाचा आणि नैतिकतेचा केंद्रबिंदू ठरताना दिसतो. जो आजच्या घडीला समाजासाठी मार्गदर्शक ठरतो.

मुंगी उडाली आकाशी| तिने गेलेले सूर्याशी| थोर नवलाव झाला| वांझे पुत्र प्रसवला|| यामध्ये मुक्ताबाई जे

**संत जनाबाई:** (समाधी इ.स. १३५०- श.१२७२)

संत परंपरेतील संतवाटीचे ‘जाईची वेल’ म्हणून जनाबाईंचा उल्लेख केला जातो. नामदेवांच्या प्रभावातील या कवियत्रीच्या नावावर त्यांचे पन्नास अभंग आहेत तरीही नामदेवांनी जनाबाईंची अपेक्षा केलेली दिसून येते. यांना विद्वानांकडून उपेक्षित असणारी कवयित्री म्हटले आहे. कारण, समकालीन संतांची चरित्रे गायलेली दिसतात. पण जनाबाईंच्या बद्दल नोंद घेतलेली दिसून येत नाही. ‘माय गेली, बाप गेला, आता सांभाळी, विठ्ठला’ अशी आर्त हाक विठ्ठलाला देणारी ‘नामयाची जणी’ बनण्यात जीवनाचे सार्थक मानणारी जनाबाई.

राजाई गोणाई | अखंडित तुझे पायी |
मज ठेविले द्वारी | नीच म्हणुनी बाहेरी||

अतिशय शूद्र असणारी जनाबाई दासीचे जीवन जगत होत्या. घरी दारी हीन दर्जाची वागणूक मिळत असताना, जनाबाई आपल्या अभंगातून समाजातील दुटप्पी वृत्तीचा प्रश्न करताना दिसतात. जनाबाईंनी त्यांचे आयुष्य नामदेवांच्या घरकामात घालवले. पण जनाबाई थेट नामदेवांना ‘तुमच्या भक्ती समाजात मला स्थान नाही का?’ असा स्पष्ट प्रश्न विचारण्याचे धाडस अभंगातून केलेले दिसून येते. जनाबाईंनी स्वतःला नीच म्हणवले जाण्याची, जाती आधारित वागणूक न लपवता सामाजिक वस्तूस्थिती मांडताना दिसतात. ‘डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी’ असे संसारातून मुक्त झालेल्या एका बंडखोर मनाचे अस्तित्व दिसून येते. या अभंगात स्त्रीच्या वागण्या बोलण्यावर हालचाली नंबर समाजाने लादलेल्या बंधना नकार देताना दिसतो. या अभंगातून जनाबाईंनी निर्भयपणे विद्रोह केलेला दिसून येतो. स्त्री ‘जन्मा आले म्हणून न व्हावे उदास’ हा स्त्रीदर्शक उद्गार, स्त्रीमुक्तीचा विचार, स्त्रीवादी जाणिवेचा आहे. तो मराठी संत स्त्री साहित्यातील जगातील स्त्रीवादी चळवळीतील पहिला हुंकार म्हटले तरी वावगे ठरू नये. त्यांचा हा काव्य विचार स्त्रीला दिलेल्या दुय्यमते विरुद्धचा शांत विद्रोह आहे असे वाटते.

ऐसा येळकोट केला जनी म्हणे विठू मेला| रागा येऊनी काय करीसी तुझे बाळ आम्हा पाशी| अरे विठ्या अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या| तुझे गेले मढे तुला पाहून काळ रडे||

या अभंगातून जनाबाईने देवाशी बोलण्याची ठराविक मर्यादा मोडताना दिसते. त्यांनी स्त्री स्वभाव विरोध

मोकळेपणाने देवाला शिव्यातून हाक मारणे हे त्या काळात धाडसाचेच काम होते. जनाबाईंचा हा विद्रोह नैतिकतेशी संबंधित असणारा जाणवतो. जनाबाई या शास्त्र पंडित नव्हत्या. त्या एक कष्टकरी स्त्री होत्या त्यामुळे त्यांना ग्रंथ ज्ञानाचा अहंकार नव्हता. त्यांनी कर्मकांड तसेच पंडिती धर्मशास्त्राचा निषेध केला. त्यांच्यासाठी अनुभव हेच ज्ञान आणि सेवा हीच भक्ती होती. दलित स्त्रीच्या जीवनानुभवाला अध्यात्मिक प्रतिष्ठा मिळवून दिल्याने 'पढिकतेचा निषेध' म्हणता येईल. जनाबाईंचा पढिकतेचा निषेध हा विद्रोही स्वरूपाचा नव्हता. श्रमाधिष्ठित भक्तीचा शांत सेवाभावी प्रतिसाद असल्याचे दिसून येते.

**बहिणाबाई : (इ.स. १६२८-१७००)**

मुक्ताबाई, जनाबाई यांचा तेराव्या शतकातील विद्रोही विचारांची मांडणी ही सोळाव्या शतकापर्यंत काळानुसार बदलताना दिसते. ज्ञानदेव नामदेवांपेक्षा तुकारामांच्या विचारांमध्ये परखडपणा अधिकतेने दिसून येतो. सहाजिक तुकारामांची शिष्या बहिणाबाईच्या अभंगांमध्ये पुरुषसत्ताक समाजविरोध प्रकर्षाने दिसतो. बहिणाबाई तीन वर्षाच्या असताना तीस वर्षाच्या बिजवराशी त्यांचा विवाह झाला होता. त्या एक संसारी ब्राह्मण स्त्री होत्या. त्यांचा विद्रोह हा पती प्रधान सत्तेविरोधी आहे.

"आले मना तेव्हा मारिले बळकट| बांधोनिया मोट टाकीयेला||" त्याकाळी बायकोने नवऱ्याला वाईट बोलू नये, घरातला छळ बाहेर सांगू नये, पतीने दिलेला मार खाणं हे स्त्रीचं नशीब मानले जायचं अशावेळी बहिणाबाई मात्र पतीने केलेली मारहाण सांगतात, बांधून ठेवल्याचा अन्याय मांडतात. देवभक्ती मुळे झालेला छळ स्पष्टपणे विद्रोही स्वरुपात मांडताना दिसतात.

"सर्वांगळी जीव सारिखाचि एक| पशु-पक्षी देख चांडाळादि||
पुढे जीव होती मागे बहु झाले| ब्राह्मणत्व आले नाही तया||
बहिणी म्हणे जीव प्राणीमात्री एक ब्राह्मणत्व देख म्हणो नये||
बहिणी म्हणे ब्रह्मी नांदे तो ब्राह्मण| यातीसी प्रमाण नसे तेथे||"

बहिणाबाई या अभंगातून सगळ्यात एकच जीव आहे. जात, जन्म, कुळ हे सगळे माणसांनी केलेले भेद असून ज्याच्याकडे ब्रह्मज्ञान आहे तो ब्राह्मण, अशाप्रकारे जातीव्यवस्थेचा निषेध केलेला जाणवतो. जन्माच्या आधारावर असलेल्या ब्राह्मणात्वाला एक ब्राह्मण स्त्रीनेच केलेले आव्हान दिसून येते. जातीभेदाला विरोध आणि समतेचा आग्रह एक ब्राह्मण स्त्री एवढ्या धीटपणे करते हे बहिणाबाईचे वेगळेपण दिसून येते.

भ्रतार तो मज| ओढतो एकांती| भोगावे मजसी म्हणोनिया|| स्त्रीची इच्छा येथे विचारात घेतली जात नाही. नवरा म्हणजे मालक असतो, स्त्रीचा देह हा तिचा नसून तो नवऱ्याचा असतो, अशी भावना समाजामध्ये रूढ आहे. समाजामध्ये अशा गोष्टी गुपित असतात. स्पष्ट बोलल्या जात नाहीत. बहिणाबाईंनी स्त्रीच्या अनुभवाला बोलकं करून परखडपणे मांडलेले दिसते. अशा वेळी भ्रतारा संगे परमार्थ घडणे अवघड आणि भ्रताराचा त्याग करणे तर वेदांच्या विरोधात जाणे अशा प्रकारच्या द्विधा मनस्थिती असताना स्त्रीच्या देहावर होणाऱ्या अत्याचाराला पतिविरोधी निर्भयपणे मांडताना दिसून येतो. हा स्त्री देहाच्या स्वातंत्र्याचा पहिला स्वर असल्याचे जाणवते.

**कान्होपात्रा : (१५वे शतक)**

ही देवदासी होती मंगळवेढ्यातील शामा गनिकेची मुलगी 'कान्हो'. व्यवसाय सदृश्य विशेष नाम 'पात्र' यादवकाळात पात्र या शब्दासाठी 'गणिका' शब्दप्रयोग प्रचलित होत. अशा अर्थाने तिचे नाव 'कान्होपात्रा'. ती ज्या

देवदासी परंपरेत जन्माला आली त्या परंपरेमुळे तिला कमी लेखले गेले तिच्या देहाकडे चारित्र्याकडे जातीकडे समाजाची दृष्टी वाईट होती. म्हणून ती विठ्ठलाला म्हणते,

“पतीत तू पावना| म्हणविसी नारायणा|| जरी सांभाळी वचन| ब्रीद वागविसी जाण|| याती शुद्ध नाही भाव| दृष्ट आचरण स्वभाव|| मुखी नाम नाही| कान्होपात्रा शरण पायी||”

पतीतांना पावन करून त्यांचा उद्धार करणारा तूच आहेस. असं तूच म्हणतोस, हेच जर खरं असेल तर मी हिन जातीत जन्माला आले मी अपवित्र आहे. मी तुझ्या पायाशी आले. आता तूच मला पवित्र कर. समाजापासून मला अभय दिलास तरच तूझे ब्रीद खरे आहे असे मी समजेन, असा समाजाच्या विरोधीतील वाद प्रत्यक्ष विठ्ठलाशी करताना दिसते.

‘म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे, करावा जाताना ब्रीदासाठी|’ देवदासी परंपरेत देह हा समाजाचा होता. कान्होपात्रा समाजाचा तो अधिकार नाकारते. तो देह देवाशी नाते सांगण्यासाठी वापरते. विक्रीसाठी नाही. असा देवदासी स्त्रियांच्या सामाजिक मालकी हक्काला कान्होपात्रा स्पष्टपणे नाकारताना दिसून येते. असा स्वतःच्या देहाचा निर्णय स्वतः घेते. हे त्या काळाचे खूप मोठे धाडस होते.

पतित पावना म्हणविसी आधी| तरी का उपाधी भक्ता मागे|
तुझे म्हणविता दुजे अंग संग| उणेपणा सांग कोणाकडे|

कान्होपात्राचा हा विद्रोह समाजाविरोधी नसून समाज सुधारणेकडे असल्याचे दिसते. ती देवाला प्रश्न विचारते, ‘तू जर पतीत पावन स्वतःला म्हणतोस तर, मला समाज अपवित्र का म्हणतो? मी जर तुझी भक्त असेल तर माझ्यामध्ये काय उणेपणा आहे?’ कान्होपात्रा थेट देवाशी बोलताना दिसते. तिला कोणत्याही मध्यस्थीची गरज भासताना दिसत नाही. आपली हिनता नाकारून धर्माच्या नावाने वागणाऱ्या समाजाविरुद्ध कान्होपात्राचा विद्रोह दिसतो.

कान्होपात्राचा विद्रोह हा देवा विरुद्ध नाही देवाच्या नावाने स्त्रीवर अन्याय करणाऱ्या समाजाच्या विरोधात आह. भक्तीच्या भाषेतून झालेला विद्रोह हा स्त्रीच्या अस्मितेचा आणि आत्मसन्मानाचा आवाज आहे असे वाटते.

“नको देवराया अंत आता पाहू| प्राण हा सर्वथा जाऊ पाहे| हरणीचे पाडस व्याघ्रे धरियेले| मज लागी जाहले तैसे देवा||”

तक्रार न करता दुःख सहन करणे हा स्त्री जातीचा धर्म समाजामध्ये मानला जातो. पण कान्होपात्राने आता नको! पुरे झाले! असा स्त्रीच्या अनुभवातून आलेल्या मौनाचा भंग विरोधातून केला आहे. समाजातील हिंसक वृत्ती आणि अमानवी वागणूकी विरोधातील अप्रत्यक्षपणे मांडलेला विद्रोहाचा विचार दर्शविलेला आहे.

**सोयराबाई : (१४वे शतक)**

संत चोखोबा चोखामेळा यांच्या पत्नी सोयराबाई त्या स्वतःला ‘चोख्याची महारी’ म्हणवतात. त्यांचे अभंगरचना विपुल असली तरी दाते मध्ये ६२ अभंग आहेत. सोयराबाईंचे अभंग भक्तिपर नाहीत तर समाजातील लिंग भेदाविरुद्ध जातिव्यवस्था विरोधी आहेत. माणसाने अध्यात्मिक महत्त्व फक्त जन्माने किंवा जातीने ठरत नाही. त्याचे मूल्य हे त्या व्यक्तीच्या अनुभवातून त्याच्या आध्यात्मिक प्रगतीवर अवलंबून असते.

देहासी विटाळ म्हणती सकळ| आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध|
देहीचा विटाळ देहीच जन्मला| सोवळा तो झाला कवण धर्म|

सोयराबाईंच्या या अभंगांमध्ये असे दिसते की, समाजातील स्त्रीला देहावरून किंवा जन्मावरून, शुद्ध-अशुद्ध, पवित्र-अपवित्र ठरवणे ही समाजाची कल्पना चुकीचे आहे. आत्म्याच्या शुद्धतेचा विचार महत्त्वाचा असतो. अध्यात्मिक मुल्ये ही जन्म किंवा जातीवरून न ठरवता, आध्यात्मिक प्रगतीवर ठरवली पाहिजेत. स्त्री

देहाला अपवित्र मानणाऱ्या सामाजिक नियमांच्या विरोधातील त्यांचा विद्रोह दिसून येतो. कोणाचाही जन्म विटाळा शिवाय होत नाही असे म्हणणे त्याकाळी धाडसाचेच होते. अशारीतीने त्यांनी आत्म्याच्या शुद्धतेचा आणि देहाच्या अपवित्रतेच्या विचारांचा निषेध केलेला दिसून येतो.

पंढरीचे ब्राह्मणे| चोख्यासी छळीले| तयालागी केले नवल देवे||

सकळं समुदाव चोखियाचे घरी| रिद्धी सिद्धी द्वारी तिष्टताती|| रंगमाळा सडे गुढीया तोरणे| आनंदे कीर्तन वैष्णवांचे|| असंख्य ब्राह्मण बैसल्या पंगती| विमानी पाहती सुरवर|| तो सुख सोहळा दिवाळी दसरा| वोवाळी सोयरा चोखीयासी||

पंढरीतील ब्राह्मणांनी चोखामेळ्याचा अपमान केला, त्याला छळलं, कारण तो अस्पृश्य होता. त्यांच्या जीवाची झालेली तगमग, वेदना अभंगातून अविष्कृत होताना दिसतो. पतिसुलभ सोयराबाईंनी हा अभंग अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि ब्राह्मणांच्या धार्मिक सत्तेला आव्हान देणारा आहे. अस्पृश्य असल्याकारणाने जे घडणार नाही ते त्याची कल्पना सोयराबाईनी केली. चोखोबाच्या घरी ब्राह्मण बसून जेवतात, ही कल्पना त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला उलथवून टाकणारी आहे. हा विद्रोह आक्रमक नाही, भक्तीच्या माध्यमातून कल्पनेतून व्यक्त झालेला आणि मानवसमतेचा आग्रह धरणारा आहे असे वाटते.

**समारोप :**

भक्ती चळवळीतील स्त्री संतांचे साहित्य हे केवळ भक्तिभाव व्यक्त करणारे नाही, ते त्या काळातील अन्यायकारक सामाजिक रचनेला मूकपणे ठाम आव्हान केलेले आहे. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई आणि सोयराबाई या संत स्त्रियांनी आपल्या अनुभवातून समाजातील जात, लिंग, देह, शुद्ध-अशुद्ध आणि अधिकार या संकल्पनांवर आहे. त्यांच्या रचनेतून सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातील विरोधात्मक स्वर दिसून येतो. या स्त्री संतांचा विद्रोहाचा स्वर हा हिंसक किंवा आक्रमक नसून नैतिक, वैचारिक आणि मानवी मूल्यांवर आधारित असल्याचे दिसून येते. त्यांनी समाजाला फक्त विरोध केला नाही, तर समतेचा, करुणेचा आणि मानवतेचा नवा मार्ग दाखवला. म्हणूनच भक्ती चळवळीतील स्त्री संत साहित्य हे केवळ धार्मिक नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरताना दिसते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. नसीराबादकर, ल. रा.,मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाषा विकास संशोधन संस्था: कोल्हापूर(२०२३).
2. बडवे, सतीश, मध्ययुगीन मराठी वाङ्मय: चिंतन आणि चर्चा, शब्दालय प्रकाशन: श्रीरामपूर(२०२५).
3. पठाण, ताहेर, एच. कदम, न. ब. (संपा.). संत साहित्यमीमांसा भाषा संप्रदाय आणि संशोधन, शब्दालय प्रकाशन: श्रीरामपूर(२०१७)
4. सरदार, गं.बा., संत वांङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवांङ्मय प्रकाशन (११वी आ. २०२३)